पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४८८ दिनांक - ०४/०७/२०२३**

पोलीस आयुक्तालय, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये

## ऑल आऊट ऑपरेशन राबवुन सराईत गुन्हेगारांवर केली प्रतिबंधक कारवाई

श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कोंबिंग ऑपरेशन करुन गुन्हेगारांना चेकींग करुन प्रतिबंधक कारवाई करणे, तसेच हॉटेल/लॉजेस/ढाबे, एस. टी. व बस स्थानके, रेल्वे स्टेशन, तसेच सार्वजनिक ठिकाणी आढळून येणारे संशयीत इसम/घटना इत्यादी कसून तपासणी करणे बाबत आदेश दिले होते. त्याप्रमाणे पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधे गुन्हे शाखा व पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार यांची पथके स्थापन करुन पुणे शहरातील वेगवेगळया परीसरात दिनांक ०३/०७/२०२३ रोजी २२.०० ते दिनांक ०४/०७/२०२३ रोजी ०२.०० वा. पर्यत कोंबिग ऑपरेशन व तपासणी करुन खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

**आरोपी चेकींग अभियानमध्ये एकुण १८३२ गुन्हेगारांना चेक करण्यात आले असून त्यापैकी ६३९ गुन्हेगार मिळुन आले आहेत.**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये एकुण ११ आर्म ॲक्ट गुन्ह्यांमध्ये एकुण ११ आरोपी अटक करुन त्यांचेकडुन १ पिस्टल, २ जिवंत काडतुसे, तसेच १० धारदार हत्यारे असा एकुण ४७,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ १ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

परिमंडळ १ मध्ये मालमत्तेविरुध्दचे एकुण २ गुन्ह्यातील आरोपी अटक करुन त्यांचेकडुन एकुण ५,०९,०००/- रुपये किंमतीचे २५ मोबाईल फोन जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच मोका गुन्ह्यातील १ व चोरीच्या गुन्ह्यातील १ पाहिजे आरोपी यांना अटक करण्यात आलेली आहे. तसेच प्रोव्हिबिशन प्रमाणे २ केसेसे करण्यात आलेल्या असुन आरोपींकडुन १७६०/-रुपयांचा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण ४ केसेस करुन १ आरोपी अटक करुन ६,७६०/ रुपयांचा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ २ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये परिमंडळ-२ मध्ये एकुण ५ शरीराविरुध्दचे गुन्हे दाखल करण्यात आलेले असुन त्यामध्ये एकुण ७ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे ३ केसेस करण्यात आलेल्या असुन त्यामध्ये एकुण ४ आरोपी अटक करण्यात आले असुन त्यांचेकडुन एकुण ३,५३०/ रुपयांचा तसेच प्रोव्हिबिशनमध्ये एकुण ५ केसेस करुन ५ आरोपींकडुन ९,५२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ३ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये परिमंडळ-३ मध्ये एकुण प्रोव्हिबिशनमध्ये एकुण ११ केसेस करुन ११ आरोपी कडुन १९,०९०/- रुपयांचा प्रोव्हिबिशन मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ४ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये परिमंडळ-४ मध्ये एकुण ६ गुन्हे दाखल करण्यात आलेले असुन ६ आरोपींना अटक करुन ८९९९/-रुपयांचा प्रतिबंधित (गांजा, तंबाखूजन्य गुटखा) मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण १४ केसेस करण्यात आलेल्या असुन २२ आरोपींना अटक करुन त्यांचेकडुन एकुण २०,२६०/ रुपये किंमतीचा जुगारामध्ये रोख रक्कम व मुद्देमाल माल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच प्रोव्हिबिशन ॲक्ट प्रमाणे एकुण २२ केसेस मध्ये ३२,२८०/ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ५ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये परिमंडळ-५ मध्ये प्रोव्हिबिशन ॲक्ट प्रमाणे एकुण ९ केसेस मध्ये ९ आरोपी यांना अटक करुन त्यांचेकडुन १३,८४०/-रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच गुन्ह्यातील ३ पाहिजे आरोपी अटक करण्यात आलेली आहे.

**सदर विशेष मोहिमे दरम्यान एकुण कारवाईचा आढावा घेतला असता खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.**

- शिवाजीनगर, भारती विद्यापीठ, खडकी, विश्रांतवाडी, चतुःश्रृंगी, चंदननगर, येरवडा, विमानतळ, लोणीकंद, हडपसर, मुंढवा व कोंढवा पोलीस स्टेशनने बेलेबल व नॉन बेलेबल वारंट बजावणी उत्कृष्ठपणे केलेली आहे.
- मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट प्रमाणे गुन्हे शाखेने ११ केसेस व पोलीस स्टेशनने ४९ केसेस करुन गावठी दारु व विदेशी बॉटल, रोख असे एकुण रु. १,२४,२००/- व कि.चा. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- महा.जुगार ॲक्ट प्रमाणे पोलीस स्टेशनने २१ केसेस करुन त्यामध्ये ८२ आरोपींना अटक करुन जुगार साहित्य व रोख रु. १३,२९०/- कि.चा. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- सीआरपीसी कायदा १५१(१), १०९, १४९, प्रमाणे एकुण ४५ आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई केलेली आहे.
- तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १४२ प्रमाणे गुन्हे शाखेने १३ तडीपार गुन्हेगारांवर कारवाई केलेली आहे.
- पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील एकुण ४५५ हॉटेल, ढाबे व लॉजेस चेक, तसेच ८५ एस टी स्टॅण्ड/ रेल्वे स्थानक/ निर्जन ठिकाणे चेक करण्यात आले आहे.
- पोलीस स्टेशनकडुन २८ ठिकाणी नाकाबंदी करुन नाकाबंदी दरम्यान ३२८२ संशयित वाहन चालकांना चेक करुन ४७५ जणांवर रु. १,२२,०००/- ची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
- वाहतुक शाखेकडुन ११२९ संशयित वाहन चालकांना चेक करुन ४९६ जणावंर रु. ४,०८,६००/- ची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
- **पुणे शहर पोलीस आयुक्तालयात दंगा करणारे, रात्रीच्या वेळी वाहन तोडफोड करणारे, दहशत निर्माण करणारे गुन्हेगार यांची नव्याने यादी तयार करण्यात आलेली असुन त्यांचेवर पुणे शहर पोलीसांकडुन कारवाई करण्यास सुरुवात केलेली आहे.**

वरील प्रमाणे मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.रितेश कुमार, यांचे आदेशान्वये, मा.पोलीस सहआयुक्त, श्री. संदीप कर्णिक, पुणे शहर, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. प्रविण पाटील, मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, श्री. रंजन कुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री.रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.अमोल झेंडे, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, संदीप सिंह गिल्ल, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील,मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, सुहेल शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४, श्री. शशिकांत बोराटे, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-५, श्री.विक्रांत देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त,वाहतुक विभाग,श्री.विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व पोलीस ठाणेकडील अधिकारी / अंमलदार तसेच वाहतुक विभागाकडील अधिकारी / अंमलदार यांचे पथकाने संयुक्तपणे उपरोक्त कामगिरी केली आहे. यापुढेही कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात येवून गुन्हेगारांचे हालचालींवर सक्त नजर ठेवून त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

| अ.नं. | | एकुण कारवाया | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| १ | **आर्म्स ॲक्ट** | ११ | ११ |
| २ | **मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट** | ६० | ५३ |
| ३ | **मपोका क १४२ प्रमाणे** | १३ | १३ |
| ४ | **जुगार ॲक्ट** | २१ | ८२ |
| | | **एकुण अटक आरोपी** | १५९ |